नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १२५ | Issue - 125 | वार सोमवार दि. २२ सप्टेंबर २०२५ | Blow- Monday Date 22 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# इतर देशांवर अवलंबून राहणे, हाच भारताचा सर्वांत मोठा शत्रू

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; पुन्हा एकदा 'आत्मनिर्भर भारता'ची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भावनगर (गुजरात): जागतिक बंधुत्वाच्या भावनेने भारत पुढे वाटचाल करत आहे. देशाला आज जगात कोणताही मोठा शत्रू नाही; परंतु इतर देशांवर अवलंबून राहणे, हाच भारताचा सर्वांत मोठा शत्रू आहे,' असे नमूद करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा 'आत्मनिर्भर भारता'ची हाक दिली; तसेच सेमीकंडक्टर ते जहाजबांधणी यांची निर्मिती देशातच होणे अगत्याचे आहे,' असा आग्रह धरला.

'अनेक गोष्टींसाठी परदेशांवर अवलंबून राहिल्याने देशाचे नुकसान होते. जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी जगातील सर्वांत मोठ्या लोकसंख्येच्या देशाने आत्म निर्भर राहणे आवश्यक आहे. १४० कोटी जनता विदेशावर अवलंबून राहणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीय आत्मसन्मानाला बाधा पोहोचते. सर्व समस्यांवर एकच उपाय आहे, आत्मनिर्भरता,' असे मोदी म्हणाले.

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील लोथल येथे उभारण्यात येत असलेल्या नॅशनल मेरिटाइम हेरिटेज कॉम्प्लेक्सची (एनएमएचसी) पाहणी केली. लोथल या ठिकाणाला जहाज बांधणीचा प्राचीन वारसा आहे. पाच हजार वर्षांपूर्वी, सिंधु संस्कृती वेळी हे ठिकाण मोठे बंदर होते व तेथे जहाजांची दुरुस्तीही केली जायची. त्यामुळे याठिकाणी एनएमएचसीची उभारणी केली जात आहे.



भारताच्या स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आलेल्या पक्षाने 'लायसन्स राज' आणून तत्कालीन तरुणांचे दमन केले', असा आरोप करत मोदींनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले. 'भारताच्या अंतःशक्तीकडे कायमच तत्कालीन राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले. त्यांनी आयातीवर लक्ष केंद्रित केले. परिणामी हजारो कोटी रुपयांचे घोटाळे देशात झाले. या धोरणांमुळे भारतीय तरुण दुखावला गेला आणि देशांतर्गत खऱ्या सर्जनशीलतेवर घोर अन्याय झाला, असे सांगत त्यांनी काँग्रेसच्या धोरणांचा खरपूस समाचार घेतला.

'सेमीकंडक्टर चिप असो वा जहाज, आपण ते भारतातच तयार करायला हवे. भारत नक्कीच जगात सागरी शक्ती म्हणून नक्कीच उद्याला येईल', असे नमूद करत केंद्र सरकार या क्षेत्रात ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत असल्याचे मोदी यांनी सांगितले. सागरी क्षेत्रासंबंधित साडेसात हजार कोटींहून अधिक प्रकल्पांची पंतप्रधानांनी यावेळी पायाभरणी केली.

रसातळाला पंतप्रधानांनी यावेळी जहाज बांधणी क्षेत्राचे उदाहरण दिले. '५० वर्षांपूर्वी देशांतर्गत निर्मित जहाजांच्या माध्यमातून आपल्या देशाचा ४० टक्के व्यापार व्हायचा. मात्र, हे प्रमाण सद्यःस्थितीत फक्त पाच टक्क्यांवर आले आहे. दरवर्षी भारत विदेशी जहाज कंपन्यांना सहा लाख कोटी रुपये अदा करतो. त्यामुळे अन्य देशांत अनेक नोकऱ्या निर्माण झाल्या. आपली गंगाजळी आटली. यातील छोटी रक्कम जरी आधीच्या सरकारांनी देशांतर्गत जहाज बांधणी क्षेत्रात गुंतवली असती तर आज जगभरातील समुद्रात भारताने निर्मित केलेल्या जहाजांमधून व्यापार झाला असता. मात्र, हे क्षेत्र सध्या रसातळाला गेले आहे', असे मोदी म्हणाले.

# आजपासून जीएसटीचे नवे दर लागू होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशवासियांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी नागरिकांना नवरात्रीच्या पूर्वसंध्येला महत्त्वाची माहिती दिली. देशभरात जीएसटीचे नवे दर उद्यापासून लागू होणार आहे. उद्यापासून केवळ ५ आणि १८ टक्के जीएसटी लागू होणार आहे. त्यामुळे उद्यापासून सर्वांचं तोंड गोड होणार आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. आपल्या देशाचं हे आत्मनिर्भर भारतासाठी आणखी एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.

उद्यापासून नवरात्रीचा सण सुरु होत आहे. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी म्हणजेच २२ सप्टेंबरच्या सूर्योदयापासून जीएसटीचे नवे दर लागू होतील. उद्यापासून देशात जीएसटी बचत उत्सव सुरु होत आहे. या जीएसटी बचत उत्सवात आपली बचत वाढेल आणि आपण आपल्या आवडत्या वस्तूंना आणखी सोप्या पद्धतीने खरेदी करु शकणार आहेत. आपल्या देशाचे गरिब, मध्यम वर्गीय, तरुण, शेतकरी, महिला, दुकानदार, व्यापारी सर्वांसाठी या बचत उत्सवचा खूप फायदा होईल, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

### ५ आणि १८ टक्के जीएसटी लागू होणार

सणासुदीला सर्वांचं तोंड गोड होईल. सर्वांच्या कुटुंबांमध्ये आनंद येईल. मी देशाच्या सर्व नागरिकांचं या निमित्ताने अभिनंदन करतो. यामुळे भारताची ग्रोथ स्टोरीला वाढवतील. कारभार आणखी सोप्या करतील. तसेच गुंतवणुकीला आणखी आकर्षक करतील. तसेच प्रत्येक राज्याला विकासाच्या शर्यतीत बरोबरीचे साथीदार बनवतील, असा दावा मोदींनी केला.

२०१७ मध्ये भारताने जीएसटीचा निर्णय घेतला होता तेव्हा एक नवा इतिहास रचला गेला होता. देशाचे व्यापारी वेगवेगळ्या टॅक्समध्ये गुरफटलेले होते. वेगवेगळे टॅक्स आपल्या देशात होते. एका शहरातून दुसऱ्या शहरात माल पाठवण्यासाठी कित्येक चेकपोस्ट पास करावे लागायचे. अनेक फॉर्म भरावे लागायचे. प्रत्येत ठिकाणी टॅक्सचे वेगवेगळे नियम होते. पण आता देशभरात टॅक्सचे एकच नियम आहे, अशी माहिती मोदींनी दिली.

नरेंद्र मोदी यांनी यावेळी स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचं आवाहन नागरिकांना केलं. देशात सध्या विदेशी वस्तूंची खरेदी केली जाते. पण आता आपण आपल्या देशातील कंपन्यांच्या वस्तू खरेदी करावे. याने आत्मनिर्भर भारतचं स्वप्न पूर्ण होईल, असं नरेंद्र मोदी यांनी आवाहन केलं.

# भारताने पाकिस्तानवर केली सहा विकेटनी मात; पाकड्यांचा उन्माद शुभमनने चार शब्दात उतरवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : अभिषेक शर्माच्या आक्रमक अर्धशतकाच्या जोरावर भारताने आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील सुपर-४ लढतीत रविवारी पाकिस्तानवर सहा विकेटनी मात केली. पाकिस्तानने दिलेले १७२ धावांचे लक्ष्य भारताने १८.५ षटकांत चार विकेटच्या मोबदल्यात पूर्ण केले. या स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा भारताने पाकला पराभूत केले.

दरम्यान, शुभमन गिलने अवघ्या चार शब्दात प्रतिक्रिया देत पाकिस्तानची बत्ती गुल केली आहे. त्याचं झालं असं की, शाहीन आफ्रिदी गोलंदाजी करत असताना शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा यांना डिवचत होता. दोघांचे चित्त विचलित करण्याचे त्याचे प्रयत्न होते. अभिषेक तेव्हा काहीच बोलला नाही. पण शुभमनने पाहून घेतलं आणि आपल्या फटक्यातून उत्तर दिलं.

पाचव्या षटकात हारिस रौफ गोलंदाजी करत असताना अखेरच्या चेंडूवर शुभमन गिलने जबरदस्त फटका मारला. त्यामुळे हारिसने चिडून शुभमनबद्दल आक्रमक बाणा घेतला. अभिषेक हारिसच्या अंगावरच धावून गेल्याने वातावरण तापलं होतं. पंचांनी मध्यस्थी करत वाद मिटवला. मात्र मॅचनंतर शुभमनने केवळ चार शब्दात पाकड्यांची इज्जत काढली.

'शब्द नाही, तर खेळ बोलतो' असं ट्वीट करत पुढे भारतीय झेंडा आणि बॅट यांचे इमोजी जोडले आहेत.



दरम्यान, लक्ष्याचा पाठलाग करताना अभिषेक आणि शुभमन गिल यांनी ९.५ षटकांत १०५ धावांची सलामी देऊन विजयाचा पाया रचला. दहाव्या षटकात फहीम अश्रफच्या आत येणाऱ्या चेंडूवर गिल त्रिफळाबाद झाला. गिलने २८ चेंडूंत आठ चौकारांसह ४७ धावा केल्या. यानंतर पुढच्याच षटकात सूर्यकुमार यादव एक खराब फटका मारून बाद झाला. त्याला खातेही उघडता आले नाही. यानंतर शतक ठोकणार असे वाटत असताना अभिषेकही बाद झाला. जीवदानाचा फायदा घेऊन त्याने ३९ चेंडूंत सहा चौकार व पाच षटकारांसह ७४ धावा केल्या. या वेळी भारताला विजयासाठी ४६ चेंडूंत ४९ धावांची गरज होती. यानंतर तिलक वर्मा आणि हार्दिक पंड्याने विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. डावाच्या पहिल्याच षटकात साहिबजादा फरहानला अभिषेक शर्माकडून जीवदान मिळाले. त्या वेळी फरहानने खातेही उघडले नव्हते. यानंतर कुलदीप यादवने सईम अयुबचा अगदी सोपा झेल सोडला. ही जोडी फुटली आणि भारतीय गोलंदाजांनी पाकच्या फलंदाजांवर अंकुश राखला. पाकिस्तानला १० ते १६ षटकांत केवळ तीन विकेटच्या मोबदल्यात ३० धावाच करता आल्या. फरहानने ४५ चेंडूंत तीन षटकार व पाच चौकारांसह ५८ धावा केल्या.

# कुंभमेळ्याच्या यशस्वितेसाठी लोकसहभाग महत्वाचा : मंत्री गिरीश महाजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नाशिक/प्रतिनिधी : सिंहस्थ कुंभमेळा हा सर्वांचा आहे. तो स्वच्छ, सुरक्षित, हरित आणि यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. कुंभ मंथनातून प्राप्त सूचनांचा नियोजनात अंतर्भाव करण्यात येईल, असे प्रतिपादन जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले.

नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आज पंडित पलुस्कर सभागृह (इंद्रकुंड, पंचवटी, नाशिक) येथे कुंभ मंथन लोकसहभागातून यशस्वी कुंभमेळ्याकडे हा कार्यक्रम झाला, यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार राहुल ढिकले, आमदार मंगेश चव्हाण, नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, कुंभमेळा आयुक्त करिश्मा नायर, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या कामांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. आगामी कुंभमेळा हा नाशिकच्या भविष्यावर दूरगामी परिणाम करणारा महोत्सव आहेत. यामुळे रस्ते, पुलांची कामे होणार आहेत. रस्ते तयार करताना ती दीर्घकाळ टिकतील, असे नियोजन करण्यात येईल. टिकाऊ कामांवर भर राहील. दुचाकी प्रवासी वाहतुकीचा विचार केला जाईल. कुंभमेळ्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. सुरक्षेसाठी पुरेशा उपाययोजनांचे नियोजन करण्यात येईल. अमृत स्नानाचा कालावधी पावसाळ्यात असल्याने भाविकांच्या सुरक्षेची पुरेपूर काळजी घेण्यात येईल. कुंभमेळ्याच्या यशस्वितेसाठी समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांनी आपले योगदान द्यावे, यापुढील काळातही नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या मौलिक सुचनांची अंमलबजावणी करण्यात येईल, असे मंत्री श्री. महाजन यांनी केले.

आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले की, कुंभमेळ्यास शेकडो वर्षांची परंपरा आहे. कुंभमेळा केवळ जिल्हा प्रशासनाचा नाही, तर सर्वांचा आहे. त्यामुळे सर्व नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. त्यासाठी घर घर कुंभ अभियान राबविण्यात येईल.

कुंभमेळ्यानिमित्त विविध पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध होतील. त्या कायमस्वरूपी राहतील. पर्यटन क्षेत्राला चांगली संधी आहे. त्यामुळे नवनवीन संकल्पनांचे स्वागतच आहे. यानिमित्त नाशिकच्या विकासाला बुस्टर डोस मिळेल. याबरोबरच शहराचे रूप पालटण्यासाठी कला, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध संघटनाचा सहभाग आवश्यक आहे. कुंभमेळ्यातून नावीन्यपूर्ण संधी शोधल्या पाहिजेत. तसे झाल्यास धार्मिकतेबरोबरच आर्थिक उन्नतीचा मार्ग शोधता येईल, असेही त्यांनी सांगितले.

आयुक्त श्रीमती खत्री यांनी महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध कामांची माहिती दिली. नाशिक- संभाजीनगर रस्त्यावर शिलापूर पर्यंत सर्व्हिस रस्ता तयार करावा, गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, गर्दी टाळण्यासाठी सेलिब्रिटी व्यक्तींचे आवाहनात्मक संदेश प्रसारीत करावे. स्वयंसेवक नोंदणीसाठी पोर्टल तयार करावे, हवाई प्रवासासाठी सुविधा वाढवाव्यात, द्वारका- नाशिक रोड रस्ता वाढविणे, समृध्दी महामार्गाला जवळपास कनेक्टीव्हीटी मिळणे, मखमलाबाद परिसरात स्मार्ट सिटीच्या पार्श्वभूमीवर १००/२०० कुटुंबासाठी धर्मशाळा बांधकामाससाठी मंजुरी मिळावी, अंबड सातपुर एमआयडीसी परिसरात गटार योजना राबवावी, राम काल पथ च्या धर्तीवर रामकुंड परिसरात पर्यटकांसाठी लाईट शो करावा, नाशिक पुणे रेल्वे कनेव्टीव्हीटी वाढवावी, वॉटर एटीएम, नाशिक व्हॅली टुरिझम, माध्यम प्रतिनिधी यांच्यासाठी सुविधा, प्रदर्शन केंद्र सुरू करावे, वैद्यकीय क्षेत्रासाठी हेल्पलाइन सुरू करावी, स्वयंसेवकांना जीवरक्षक, किमान प्रशिक्षण द्यावे, पार्किंगची व्यवस्था, जकात नाक्याच्या ठिकाणी ट्रक टर्मिनल कार्यान्वित करावे, टोलनाक्यावर विविध भाषांचे हेल्प डेस्क उभारावे, कुंभमेळ्यासाठी ॲप तयार करावे, प्रवासी वाहतुकीसाठी दुचाकीला परवानगी मिळावी, निवास व्यवस्था वाढवावी आदी सूचना केल्या


### ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये महावितरणने देशात प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी केले अभिनंदन

# मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेच्या निकषात बदल करणार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन केले. तसेच मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेच्या निकषात शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे बदल करून मार्गदर्शक सूचना काढण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.



यावेळी या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर उपस्थित होत्या. यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार महाजेनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक आशिष चंदाराणा,निता केळकर, संचालक (वित्त) अनुदिप दिघे यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेच्या निकषात शेतकऱ्यांकडून निकष बदलण्याची मागणी होत आहे. ऊर्जा विभागाने समस्या लक्षात घेऊन मार्गदर्शक सूचना काढाव्यात. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनीने काम करताना महावितरण, महापारेषण व महानिर्मिती यांच्याशी संवाद वाढवून कामे गतीने करावीत. महापारेषण कंपनीने सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात नफा अंदाजे १८०० कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे. महापारेषण कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे मापदंड पूर्ण करत चांगली कामगिरी केलेली आहे. यामध्ये सातत्य राखून आगामी वर्षातही यापेक्षा अधिक सरस कामगिरी महापारेषणकडून होईल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## संपादकीय....

### आत्मनिर्भरतेची हाक

जागतिक बंधुत्वाच्या भावनेने भारत पुढे वाटचाल करत आहे. देशाला आज जगात कोणताही मोठा शत्रू नाही; परंतु इतर देशांवर अवलंबून राहणे, हाच भारताचा सर्वांत मोठा शत्रू आहे,' असे नमूद करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा 'आत्मनिर्भर भारता'ची हाक दिली; तसेच सेमीकंडक्टर ते जहाजबांधणी यांची निर्मिती देशातच होणे अगत्याचे आहे,' असा आग्रह धरला. 'अनेक गोष्टींसाठी परदेशांवर अवलंबून राहिल्याने देशाचे नुकसान होते. जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी जगातील सर्वांत मोठ्या लोकसंख्येच्या देशाने आत्मनिर्भर राहणे आवश्यक आहे. १४० कोटी जनता विदेशावर अवलंबून राहणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीय आत्मसन्मानाला बाधा पोहोचते. सर्व समस्यांवर एकच उपाय आहे, आत्मनिर्भरता. 'भारताच्या अंतःशक्तीकडे कायमच तत्कालीन राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले. त्यांनी आयातीवर लक्ष केंद्रित केले. परिणामी हजारो कोटी रुपयांचे घोटाळे देशात झाले. या धोरणांमुळे भारतीय तरुण दुखावला गेला आणि देशांतर्गत खऱ्या सर्जनशीलतेवर घोर अन्याय झाला. 'सेमीकंडक्टर चिप असो वा जहाज, आपण ते भारतातच तयार करायला हवे. भारत नक्कीच जगात सागरी शक्ती म्हणून नक्कीच उद्याला येईल', असे नमूद करत केंद्र सरकार या क्षेत्रात ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत असल्याचे मोदी यांनी सांगितले. सागरी क्षेत्रासंबंधित साडेसात हजार कोटींहून अधिक प्रकल्पांची पंतप्रधानांनी यावेळी पायाभरणी केली.

# सध्याच्या युगातील उतावीळ पत्रकारिता आणि यामुळे होणारी समाजाची हानी

**जे समाजामध्ये द्वेष पसरण्याच्या उद्देशाने पत्रकारिता करीत आहे अशा पत्रकारितेला उद्देशून मी लिहिलेल आहे. जे समाजाच्या भल्याची पत्रकारिता करतात त्यांना माझा मानाचा मुजरा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जसा संविधानिक पदावरती काम करणारा आमदार खासदार मंत्री हा कोणत्या एका जाती धर्माचा प्रतिनिधी नसून तो सर्वांना समान न्याय देणारा प्रतिनिधी असतो. नेमकं त्याच धरतीवर पत्रकार बांधव, न्यूज चॅनल चालवणारे त्यांचे संपादक हे कोणत्या एका जाती-धर्माचे प्रतिनिधी नसून ते राष्ट्राच्या उन्नतीसाठी राष्ट्राच्या प्रगतीसाठी जो जो काही करील त्याचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणारे खरे समाजसेवक असतात.पत्रकारिता हा खऱ्या अर्थाने समृद्ध लोकशाहीचा आधारस्तंभ (चौथा स्तंभ) असे मानतात. समाजातील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, समाजातील गोरगरीब मजूर कष्टकरी कामगार शेतकरी यांच्या समस्या या सरकारपर्यंत उत्तमरीत्या मांडण्याचे काम हे पत्रकार करत असतात.. समाजातील सुखदुःख हे आपल्या लेखणीच्या व टीव्हीवरील पत्रकारितेच्या रूपाने ते जनतेसमोर मांडत असतात. पत्रकारांमुळेच आपणास देश विदेशामध्ये घडत असलेल्या चांगल्या वाईट घटनांची आपणास माहिती मिळते. अतिशय दुर्गम भागामध्ये, अतिशय संवेदनशील भागामध्ये, युद्ध जनपरिस्थितीमध्ये देखील पत्रकार बांधव हे आपल्या स्वतःच्या जीवाची परवा न करता प्रत्येक बातमी आपल्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य प्रामाणिकपणे करत असतात. आत्ता सध्याच्या घडीला संपूर्ण महाराष्ट्र अतिवृष्टीच्या विळख्यात सापडलेला आहे.. शेत शिवारातील डोंगरदऱ्यातील शेतकऱ्यांचे चाललेले हाल अपेष्टा,झालेली पिकांची नुकसान आणि त्यातून सरकारने शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे हा जनतेचा आवाज बनवून पत्रकार बांधव हे सरकार दरबारी पाठपुरावा करत असतात.. अशा या प्रामाणिक पत्रकार बांधवांना माझा मानाचा मुजरा....

पण आता सध्याच्या घडीला महाराष्ट्रातील सामाजिक एकीची वीण उसवत असताना आणि सरकार त्यातून काहीतरी मार्ग काढण्याच्या परिस्थितीमध्ये असताना. पत्रकार बांधव हे वेगवेगळ्या समाजाच्या तथाकथित नेत्यांना असे काही सामाजिक वीण विस्कटून टाकणारे प्रश्न विचारत आहेत की त्यातून या पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा ही धुळीस मिळत आहे. अशा या समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांमध्ये अतिशय गाजलेले पत्रकार देखील सामील आहेत याचे मनाला दुःख वाटते. टीव्ही वरती जेव्हा एखादा सामाजिक प्रश्न घेऊन चर्चा चाललेली असते त्यावेळेला वेगवेगळे समाज बांधव हे आपापल्या समाजाचे प्रश्न मांडत असतात हे प्रश्न मांडत असताना एखाद्या समाजाच्या बांधवांच्या तोंडातून कळत नकळत चुकीचे शब्द बाहेर पडले. तर ते एक शब्द त्यांच्या न्यूज चॅनलवरून ते हजारो वेळा रिपीट करत असतात. मग आजच्या या मोबाईल व्हाट्सअप च्या जमान्यामध्ये ज्याला काही त्यातलं जास्त समजत नाही असा देखील त्याचं भांडवल करून तो जातीय विद्वेष पसरवत असतो. त्यातून कळत नकळत समाजामध्ये द्वेष पसरतो. त्यातून जाती-जातीमध्ये तेढ निर्माण होत असतो. त्यातून कळत नकळत मानवी मूल्यांचे हनन होत असते. काही अतिउतावळ वृत्तीचे पत्रकार हे राजकीय नेत्यांना देखील तुम्हाला तुमच्या पक्षाला अमुक अमुक नेत्याने खालच्या पातळीवर टीका केली तर त्यावर तुमचे मत काय असे प्रश्न ताबडतोब विचारतात. पण सध्य स्थितीतील काही अपवाद वगळता कोणताच पत्रकार अशा कळत नकळत एखाद्या नेत्याने उच्चारलेल्या एखाद्या नेत्याबद्दलच्या टीचे शब्द झाकून टाकून हा वाद मिटवावा असे कधीच विचार करत नाही. मग अशी ही समाजामध्ये, राजकीय नेत्या नेत्यांमध्ये राजकीय पक्षांमध्ये, माणसांमध्ये तेढ निर्माण करणारी पत्रकारिता काय कामाची??? असे समाजात राजकीय नेत्या नेत्यांमध्ये तेढ निर्माण करणारे पत्रकार या पत्रकारितेतून फारकत घेऊन घरी बसलेले केव्हाही या देशाच्या या राज्याच्या उद्धारासाठी बरे आहे असे माझे ठाम मत आहे.. काही नामांकित टीव्ही चॅनल वाले आपले काही विषयावर वेगवेगळ्या विषयावरील जाणकारांना सोबत घेऊन काही चर्चा घडवून आणत असतात. हे चर्चा घडवून आणण्याच्या अगोदर त्यांना माहित असतं की या चर्चेमध्ये कोणाला बोलवावं मग त्यातून सकारात्मक चर्चा घडेल. हे सारं माहीत असताना देखील काही चॅनलचे पत्रकार बांधव त्यांचे कोणी जे वरिष्ठ असतील ते जे समाजामध्ये विद्वेष पसरवतात अशा बांधवांना चर्चेमध्ये आमंत्रण देऊन समाजामध्ये विकारी विष पसरवण्याचे काम करत आहेत. अशा या लोकांपासून आता जनतेने सावध राहणे गरजेचे आहे..



आता सध्याची पत्रकारिता जर पाहिली तर त्यामध्ये जास्तीत जास्त एकमेकांना तोडण्याचे काम चालू आहे. एखाद्या वक्त्याकडून प्रवक्त्याकडून पत्रकार मंडळी ही अतिशय चाणाक्षपणे एखादे वादग्रस्त वक्तव्य त्यांना बोलण्यास प्रवृत्त करतात आणि त्यामध्ये साऱ्या समाजाचे नुकसान करण्याचे काम हे लोक करत आहेत यांना कोणीतरी आवर घालणं गरजेचे आहे...

एकमेकांमध्ये वैचारिक मतभेद असतात ते कधी कधी बाहेर पडतात .त्याच्यामध्ये काही गैर नसतं. पण त्यांच्या त्या बोलण्यामधून समाजामध्ये कधीकधी तेढ निर्माण होत असतो. हा तेड कमी करण्याचा प्रयत्न पत्रकार बांधव यांनी करणे गरजेचे असताना ते सतत तेढ वाढवण्यातच मग्न असतात. याला म्हणायचं तरी काय??? आपला देश इतका मोठा आहे. आपल्या राज्यात अनेक क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी केलेले अनेक ख्यातनाम व्यक्तिमत्व आहेत. अशा व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती त्यांची जडणघडण, याच्यावरती किती चॅनल वरती किती पत्रकार बांधव चर्चा करत असतात??? एखाद्या शेतकऱ्याच दुखणं,एखाद्या शेतकऱ्याची यशोगाथा, एखाद्या खेळाडूने जर खेळामध्ये नैपुण्य मिळवले तर तो खेळाडू कसा घडला याबद्दल किती पत्रकार बांधव त्याच्यापर्यंत पोहोचून त्यांचे अनुभव हे आपल्या चॅनलच्या माध्यमातून प्रसारित करत असतात. हा संशोधनाचा विषय आहे. टीव्हीवरील कोणतेही न्यूज चॅनल तुम्ही उघडला तर तुम्हाला एक गोष्ट ठळकपणे जाणवेल ते म्हणजे एखादी नकारार्थी घटना जर घडली असेल तर ती दिवसभर रिपीट रिपीट तीच बातमी आपल्या नजरेसमोर दिसेल. आणि सर्वसामान्य नागरिक देखील तीच बातमी ऐकून ऐकून पाहून पाहून आपल्या मनामध्ये नकारात्मकतेची भावना निर्माण करत आहेत.. यामध्ये कधीतरी बदल होईल काय??? जे वाईट आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करून जे चांगल आहे ते जगापुढे पुन्हा पुन्हा दाखवलं पाहिजे ही भावना पत्रकार बांधवांमध्ये,टीव्ही चॅनलच्या प्रतिनिधी मध्ये निर्माण होईल काय?... टीआरपी वाढीसाठी असलेले विषारी विकारी पत्रकारिता विषारी विखारी चर्चेचेचे कार्यक्रम टीव्ही वरून हद्दपार होतील का??? संवेदनाहीन पत्रकारांना घरचा रस्ता न्यूज चॅनल वाले दाखवतील काय? आणि या उतावीळ पत्रकारांच्या प्रश्नाने घायाळ होणाऱ्या या देशवासीयांना उत्तम वार्तांकन करणारे पत्रकार मिळू शकतील का? हा खरा प्रश्न आहे.

**शब्दांकन – श्री. मारुती देविदास शिंदे. (वागदरी ता. अक्कलकोट जिल्हा सोलापूर ४१३२१८)**

## लोकमान्य टिळक मंडळाला उत्तेजनार्थ बक्षीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आदर्श गणेशोत्सव संकल्पनेतून सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सो. यांच्या हस्ते उत्तेजनार्थ बक्षीस लोकमान्य टिळक मंडळ फंड गल्ली यांना भेटल्याबद्दल सोलापूर येथे सन्मान करण्यात आला. यावेळी करमाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रंजीत माने उपस्थित होते.

मंडळाचे अध्यक्ष संतोष भोसले व मार्गदर्शक अतुल भैया फंड, नगरसेवक बोरगाव चे सरपंच विनय ननवरे, व उद्योजक श्रीकांत ढवळे हेही उपस्थित होते.

## कोर्टी येथे मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त आमदार अभिजीत पाटील यांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील हे पंढरपूर तालुक्यातील कार्यक्रमानिमित्त गावांमध्ये हजेरी लावत असल्याने येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक मध्ये साखर पेरणी सुरू असल्याची कुजबूज पंढरपूर तालुक्यामध्ये होताना दिसत आहे.



माढा विधानसभा मतदारसंघात आमदार अभिजीत पाटील यांनी तीस वर्षाची सत्ता उलथून विजयाचा झेंडा रोवला असताना पंढरपूर तालुक्यात देखील आमदार अभिजीत पाटील हे विविध कार्यक्रमाला उपस्थित असतात. कोर्टी येथे मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त जुलूस यात्रेत आमदार अभिजीत पाटील यांनी उपस्थित राहून ईद-ए-मिलाद उन-नबी या पवित्र सणा सर्व हिंदू मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

**पंढरपूर तालुक्यात आमदार पाटील यांची कार्यक्रमाला उपस्थित राहून जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी साखर पेरणी सुरू**

यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उद्योग व व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, सुधीर भोसले, विठ्ठल कारखान्याचे संचालक बाळासाहेब हाके, गुलाब मुलाणी, सरपंच राजू पवार, पोपट हाके, बबलू शेख, ड. दत्तात्रय येडगे, शरीफ शेख, मोसिन मुलाणी, अभिजीत हाके, अफजल शेख, रहीम मुलाणी, रघुनाथ पवार,फंटू शेख, विजय वाघमारे, अहमद मुलाणी, मुन्ना शेख, बशीर मुलाणी, सादिक मुलाणी, वसीम मुलाणी, राजू मुलाणी यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत तालुक्यातील १३ शिव-पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर /प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरपासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा राबवला जात आहे. या सेवा पंधरवडा मध्ये तालुक्यातील तालुक्यातील गावागावातील शिवमानंद रस्त्याचे प्रश्न मार्गी लावण्याची मोहीम सुरू असून, तालुक्यातील वरील १३ अतिक्रमित शिव रस्ते ,पाणंद रस्ते खुले करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

या अभियानांतर्गत तालुक्यातील पाणंद रस्ते गाव नकाशावर चिन्हांकित करणे, शिव-पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, रस्ता अदालत आयोजित करुन शेतरस्त्यांचे प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, तसेच शेत रस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे केली जात आहेत. पंढरपूर तालुक्यातील १३ अतिक्रमित ११.५ कि.मी लांबीचे शिव-पाणंद रस्ते खुले करण्यात आले आहेत.

यामध्ये रोपळे, आंबे, पटवर्धन कुरोली, चळे, भाळवणी, करकंब, खर्डी या मंडळातील अतिक्रमित शिव-पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आले.पाणंद, शेतरस्ता व शिवरस्त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याबाबतच्या महसूल विभागाच्या २९ ऑगस्टच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या मोहिमेस तालुक्यातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

यावेळी विविध मंडळातील मंडळ अधिकारी, तलाठी ,पोलीस पाटील, तसेच सर्व्हअर उपस्थित होते.

# कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देशाची महासत्तेकडे वाटचाल : मुख्यमंत्री फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देशाची महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करताना अमली पदार्थ संदर्भातील गुन्ह्रे हे पोलीस दलासमोर आव्हान ठरत असून यासाठी झिरो टॉलरन्स धोरण राज्याने अवलंबले आहे. तसेच बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील गुन्ह्याची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

इंडियन पोलीस फाउंडेशनच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त भारताच्या आर्थिक विकासासाठी पोलीस दलाची पुनर्कल्पना या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे सामाजिक न्याय राज्यमंत्री असीम अरूण, इंडियन पोलीस फाउंडेशनचे प्रमुख तथा मेघालयचे माजी राज्यपाल आर.एस. मुशहारी, फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तर प्रदेशचे माजी पोलिस महासंचालक ओ.पी.सिंह, राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह विविध राज्यातील पोलीस अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस आणि मुंबई पोलिसांनी कायम उच्च दर्जा टिकवून ठेवल्याचा अभिमान आहे. पोलीस आज भारताच्या आर्थिक विकासावर चर्चा करीत आहेत ही अभिनंदनीय बाब असून, पोलीस दलात आणखी चांगले बदल घडविण्यासाठी आजच्या कार्यक्रमात होणारे विचार मंथन महत्वपूर्ण ठरतील. या विचारमंथनातून येणारे नवीन उपाययोजनांचा शासन सकारात्मक विचार करेल असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पोलीस दल तसेच समाजातही एकात्मता असणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील नकारात्मकता कमी होते आणि राज्य व देश शाश्वत प्रगतीकडे वाटचाल करू शकतो. काळानुरूप गुन्ह्यांचे स्वरूप बदलले असून, जुन्या काळातील शाश्वत मूल्यांसह नव तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रगती शक्य आहे. त्यानुसार २०२३ मध्ये नवीन पोलीस संघटनात्मक रचना तयार केली आहे. गुन्ह्यांची जलद उकल करण्यास मदत व्हावी यासाठी अत्याधुनिक सायबर सिक्युरिटी लॅब उभारण्यात आली आहे. इतर देशांनीही आपल्या राज्यासारखी लॅब बनविण्याची मागणी केली आहे. एआयच्या सहायाने गुंतागुंतीचे गुन्हे प्रकरणे अधिक वेगाने सोडविण्यात मदत होत आहे. आज अमली पदार्थांची गुन्हेगारी पोलीस दलासमोर एक आव्हान आहे. यामध्ये झिरो टोलरन्स असणे महत्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. संविधानात पोलिस व्यवस्थेत चेक अँड बॅलन्सची तरतूद असून अनेक अधिकाऱ्यांनी उपलब्ध कायद्यांचा वापर करून परिवर्तनशील सुधारणा केल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आयपीसी, सीआरपीसी व इंडियन एव्हिडन्स ॲक्ट हे इंग्रजांच्या काळातील कायदे असल्याने लोकशाहीच्या अधिष्ठानावर त्यात आवश्यक बदल करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पोलीसांची भूमिका अधिक प्रभावी होण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यासपीठांचा वापर करणे आवश्यक आहे. सोशल मीडिया आणि ऑनलाईन प्लॅटफॉम द्वारे गुन्हेगारी वाढत असून, डेटा नालिटिक्स, मशीन लर्निंग आणि डिजिटल ट्रॅकिंग, ऑनलाईन गुन्ह्यांवर जदल प्रतिसादासाठी विशेष असे नव तंत्रज्ञान आणि पद्धती वापरणे आवश्यक आहे.

आपली अर्थव्यवस्था कृषी आधारित होती. आताही कृषी क्षेत्र तेवढेच महत्वाचे असून, बदलत्या काळानुरूप अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. राज्य किंवा देशाची अर्थव्यवस्था ५५ ते ६५ टक्के सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. या दोन्ही क्षेत्रावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेची आव्हाने वेगळी आहेत. त्यामुळे बदलत्या सेवा क्षेत्राची परिभाषा समजून घेणे आवश्यक आहे. पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासोबतच शाश्वत मूल्ये कायम ठेवण्याचा प्रयत्न होणेही आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी गुंतवणूक परिसंस्थेत 'विश्वास आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासन', 'डिजिटल सीमांचे संरक्षण : धोरणात्मक पोलिस-उद्योग सहकार्याची गरज' या विषयांवर चर्चा करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपुरात साकारले भव्य श्रीराम मंदिर

## नवरात्र महोत्सवानिमित्त क्रांतिसिंह नाना पाटील चौक तरुण मंडळाचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

नवरात्र महोत्सवानिमित्त पंढरपूर येथील क्रांतीचे नाना पाटील तरुण मंडळ व संतोष भाऊ नेत्राव मित्र मंडळ यांच्या वतीने यंदाच्या वर्षी भव्य दिव्य अशा श्रीराम मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आलेली आहे.



नेत्राव परिवाराच्यावतीने नवरात्र महोत्सवाचे यंदा ४८ व्या वर्ष असून प्रत्येक वर्षी काहीतरी नाविन्यपूर्ण देखावे साकारण्यात येत असतात. यापूर्वी साई मंदिर तुळजाभवानी मंदिर, केदारनाथ मंदिर, बद्रीनाथ मंदिर, उज्जैन मंदिर, जयपुर पॅलेस, गणपतीपुळे, अंबरनाथ असे अनेक प्रतिकृती उभा करून पंढरपूर मधील नागरिकांना एक परभणीच असते. अगदी त्याप्रमाणे याही वर्षी भव्य असे ६० बाय ९० यामध्ये श्रीराम मंदिर उभे करण्यात आले असल्याचे माहिती संतोष भाऊ नेहतराव यांनी दिली.

या नवरात्र उत्सवाचे दिनांक २२ सप्टेंबर रोजी पंढरपूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे दिनांक २४ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून दिनांक २५ सप्टेंबर रोजी गंध मराठी मातीचा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून दिनांक २६ सप्टेंबर महारथी व राज्यस्तरीय डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर २७ सप्टेंबर रोजी सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे प्रस्तुत शिंदेशाही कार्यक्रम तर दिनांक २८ सप्टेंबर रोजी डान्स स्पर्धा व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सामाजिक गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. दिनांक ३० सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिर, होम मिनिस्टर स्पर्धा तर दिनांक १ ऑक्टोबर रोजी दांडिया २ ऑक्टोबरला विजयादशमी असे सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत या महोत्सवांमध्ये दररोज फराळाचे वाटप करण्यात येते.

सध्या देशात सर्वत्र अयोध्या येतील भव्य दिव्य अशा श्रीराम मंदिराची चर्चा होत असून अनेक भाविकांनी प्रत्यक्षात अयोध्ये येथे जाऊन श्रीरामाचे दर्शन घेतलेली आहे. मात्र इच्छा असूनही काही नागरिकांना अद्यापही हयोद्येला जाता आलेली नाही त्यामुळे त्या नागरिकांची इच्छा अगदी आपल्या पंढरपुरात पूर्ण व्हावी या हेतूने श्रीराम मंदिराची भव्य दिव्याची प्रतिकृतीच पंढरपुरात संतोष नेहतराव मित्र मंडळांनी उभी केलेली आहे.

विशेष म्हणजे संतोष नेत्राव हे पंढरपूरच्या राजकीय क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्व असून त्यांनी यांच्यासह त्यांचे बंधू सुरेश नेत्रा, बाळासाहेब नेत्राव या तिन्ही बंधूंनी पंढरपूर नगरपरिषदेचे नगरसेवक पद भूषवले आहे. मी नेहतराव परिवार हा माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील, यांना मानणारा असून त्यांच्या माध्यमातून संतोष नेहतराव यांना भेट



दिली व येथील केंद्रीय कमिटीचे उपाध्यक्ष पद मिळाले होते त्यामुळे राजकारण करीत असताना सामाजिक राबवण्याची काम नेहतराव परिवाराने आजपर्यंत केलेली आहे.

पंढरपूर नगर परिषदेचे नगराचे पदाच्या निवडणुकीत संतोष नेहतराव यांनी लक्षवेधी मताधिक्य मिळवलेले होते. त्यांना म्हणणारा मोठा वर्ग पंढरपूर शहरात कार्यरत आहे संतोष भाऊ नेहतराव हे नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांच्या अडीअडचणीला धावून जाणारे नेतृत्व म्हणून ओळखले जाते.

---

# कष्टकरी, शेतमजूर समाज ग्रामीण भागाचा महत्वाचा कणा : चेअरमन माधवराव घाटगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ग्रामीण भागातील कष्टकरी व शेतमजूर समाज प्रामाणिकपणे कष्ट करून आपल्या संसाराचा गाडा चालवत असतात. या समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सुरेश सासणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे . कष्टकरी शेतमजूर हाच ग्रामीण भागाचा महत्त्वाचा कणा असल्याचे प्रतिपादन श्री गुरुदत्त शुगर्सचे चेअरमन व कार्यकारी संचालक माधवराव घाटगे यांनी केले. तेरवाड येथे महाराष्ट्र राज्य कष्टकरी शेतमजूर संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा संपन्न झाला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. घाटगे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूर भाजपा चे जिल्हाअध्यक्ष राजवर्धन नाईक – निंबाळकर होते. पुढे बोलताना घाटगे म्हणाले, घरातील चांगल्या संस्कारातूनच संस्कारक्षम पिढी घडवू शकते. त्यासाठी कुटुंबातील जेष्ठांचा पुढकार महत्वाचा आहे .जीवनामध्ये पैसा हे जीवन जगण्याचे साधन असून ते अंतिम साध्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने आनंदी व समाधानी जीवन जगले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्र राज्य शेतमजूर व कष्टकरी संघटनेच



**महाराष्ट्र राज्य कष्टकरी शेतमजूर संघटनेचा मेळावा**

अध्यक्ष सुरेश सासणे म्हणाले,संजय गांधी श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेचे पेन्शन १५०० रुपये वरून २५०० रुपये करण्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने केले आहे.पेन्शन वाढीच्या या महत्त्वाच्या लढ्यामध्ये राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील , गुरुदत्त शुगरचे चेअरमन माधवराव घाटगे यांची महत्त्वाची भूमिका राहिली. भाजपचे जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर म्हणाले ,पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कष्टकरी शेतमजूर यांच्यासाठी अनेक समाज उपयोगी योजना राबवून त्यांना आधार देण्याची काम केले आहे. यावेळी कार्यक्रमाला गुरुदत्त शुगर्स चे संचालक शिवाजीराव माने – देशमुख शिवाजी सांगले , विश्वास बालिघाटे, पँथर आर्मीचे संस्थापक संतोष आठवले , शोभाताई पाणदारे यांच्यासह कष्टकरी शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

---

# सततच्या पावसामुळे आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची सोमनाथ आवताडे यांनी केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी

राज्यभरात परतीच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

गेल्या चार दिवसांपूर्वी पंढरपूर–मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील गावांमध्ये सततच्या होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

कालच मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, युवक नेते सोमनाथ आवताडे यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव, पंढरपूर तालुक्यातील रांझणी येथील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली.

याप्रसंगी सोमनाथ आवताडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

काही दिवसापूर्वी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे संवेदनशील आमदार समाधान आवताडे यांनी दूरध्वनी वरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. तसेच अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या सर्व शेती पिके व फळबागांचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या होत्या.



याची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने तालुकास्तरावरील महसूल अधिकारी व कृषी विभागाच्या वतीने पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील पावसामुळे नुकसान झालेल्या शेती पिकांचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे. याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठवल्यानंतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

पंचनामे करत असताना शेतकऱ्याने आपल्या नुकसान झालेल्या सर्व पिकांचे काळजीपूर्वक पंचनामे करून घ्यावे याबाबत काहीही अडचणी किंवा सहकार्य मिळत नसेल तर आमदार समाधानदादा आवताडे जनसंपर्क कार्यालय पंढरपूर व मंगळवेढा या संपर्क कार्यालयाकडे करावी..

---

# दिवाणी आणि जिल्हा न्यायाधीश यांचे ट्रस्ट नियमनाचे अधिकार संपुष्टात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाने पावसाळी अधिवेशनात ट्रस्ट कायद्यामध्ये अमूलाग्र बदल करण्याच्या विधेयकाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ३० ऑगस्ट रोजी मंजुरी दिली आहे. त्यामुळे १ सप्टेंबर पासून महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ राजपत्रात प्रसिद्ध झाल्याने सुधारित तरतुदी तात्काळ प्रभावाने लागू झाल्या आहेत.

त्यातील नवीन कलम ९(अ) नुसार 'तहहयात विश्वस्त' आणि कलम १७ (अ) नुसार 'पदावधी विश्वस्त' (ठराविक मुदतीसाठी) अशी स्वतंत्र व्याख्या करण्यात आली आहे. नवीन कलम ३०(अ) प्रमाणे आता एकूण विश्वस्त मंडळाच्या संख्येच्या केवळ एक चतुर्थांश एवढेच तहहयात विश्वस्त असू शकतील आणि पदावधी विश्वस्तांचा कार्यकाळ हा फक्त पाच वर्ष किंवा त्यापेक्षा कमी राहु शकेल. कार्यकाळ संपल्यावर जर पुनर्नियुक्ती झाली नाही तर अशा पदावधी विश्वस्ताचे सर्व अधिकार संपुष्टात येतील. तसेच तहहयात आणि पदावधी असे एकूण विश्वस्त न्यास पत्रामध्ये नमूद केलेल्या संख्येपेक्षा जास्त नियुक्त करता येणार नाहीत.

सर्वात महत्वाचा बदल म्हणजे नवीन कलम ५० (ब) नुसार एकाद्या ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून कार्य करण्याचे, ट्रस्टी नेमण्याचे किंवा न्यास पत्र (ट्रस्ट डीड) मध्ये बदल करण्याचे दिवाणी आणि जिल्हा न्यायाधीशांचे अधिकार रद्द करून ते सर्व अधिकार आता केवळ धर्मादाय आयुक्तांना असतील असे नमूद केले आहे.

> **ट्रस्ट नियमनाचे सर्वाधिकार धर्मादाय आयुक्तांकडे केंद्रित झाल्याने न्यास नियमन, विश्वस्तांच्या नियुक्त्या, नियमावली मध्ये बदल करण्याबाबत सुसूत्रता येईल. शिक्षेचा कालावधी वाढवल्याने कायद्याचा धाक निर्माण होईल. तहहयात विश्वस्तांच्या संख्येवर प्रतिबंध आणल्याने व्यक्तीकेंद्रित सत्तेवर अंकुश येईल.**
> **– ॲड. शिवराज कदम जहागिरदार**
> **माजी अध्यक्ष, पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर असोसिएशन, पुणे**

धर्मादाय आयक्तांच्या पूर्व परवानगीशिवाय न्यासाची स्थावर मिळकतीची विश्वस्तांनी विक्री केल्याचे सिद्ध झाल्यास कलम ६६ (अ) नुसार विश्वस्तांना एक वर्षाचा तुरुंगवास आणि पन्नास हजार रुपये दंडाची सुधारित तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे निर्धन व गरीब रुग्णांना कलम ४४ अअ नुसार मोफत अथवा अल्पदरात उपचार करण्याचे नाकारल्यास त्या रुग्णालयाच्या विश्वस्तांना कलम ६६ (ब) च्या सुधारित तरतुदीप्रमाणे एक वर्षाचा तुरुंगवास आणि पन्नास हजार रुपये दंड अशी वाढ करण्यात आली आहे.

धर्मादाय उपायुक्त अथवा सहाय्यक आयुक्तांचे आदेशा विरुद्ध सह धर्मादाय आयुक्तांकडे पुनर्विलोकन (रिव्हिजन) अर्जाद्वारे दाद मागण्यास आदेश दिनांकापासून चार महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. पूर्वी हा कालावधी नसल्याने खूप जुने आदेश बऱ्याच वर्षांनंतर आव्हानित केल्याने ट्रस्ट बाबत वाद प्रलंबित राहण्याचे प्रमाण वाढत होते.

---

# स्वराज्य युवक आघाडी कार्यकारणी लवकरच जाहीर होईल : संतोष कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई (केतन भोज) स्वराज्यप्रमुख छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या आशीर्वादाने स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस धनंजय भाऊ जाधव व स्वराज्य पक्षाचे उपाध्यक्ष अंकुश कदम बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच स्वराज्य पक्ष मुंबई युवक कार्यकारिणी जाहीर करणार असल्याचे स्वराज्य पक्ष मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी म्हटले.

सुसंस्कृत राजकारणासाठी युवकांनी महाराष्ट्र स्वराज्य पक्षात सामील झालं पाहिजे स्वराज्य पक्ष निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन काम करत नाही स्वराज्य पक्ष छत्रपतींच स्वराज्य रयतेच राज्य डोळ्यासमोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या विचारावर कार्य करणारा व त्या दिशेनं वाटचाल करणारा पक्ष आहे.गडकिल्ल्यांचे संवर्धनासाठी प्रयत्न करणारा पक्ष छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज युवराज छत्रपती संभाजीराजे महाराज हे स्वराज्य पक्षाचे प्रमुख आहेत.

युवकांनी आता पुढे आले पाहिजे कार्यक्षम युवा सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या युवकांना आपल्या हक्काच व्यासपीठ मिळावे.यासाठी युवक आघाडी अनेक नव्या युवकांना संधी देणार आहे युवकांसाठी मार्गदर्शन शिबिर व त्यांना सक्षम करण्यासाठी व त्यांना उद्योजक घडवण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे.ज्या युवकांना स्वराज्य युवक आघाडी मुंबई विभागात कार्य करायचे असल्यास ९६१९९६०७९९ या संपर्क क्रमांकावर आपण व्हॉट्सअँप करा असे कदम यांनी सांगितले

---

**हुपरीच्या कासाळ ओढ्यावरील प्रकार**

**गेल्या अनेक पिढ्यांपासूनची मागणी, शेतकऱ्यांनी केला सरकारचा निषेध**

# ओढ्यावर पुल नसल्याने शेतकरी ग्रामस्थ महिला शालेय विद्यार्थ्यांचा बंधाऱ्याच्या भिंतीवरून जीवघेणा प्रवास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी

सांगोला तालुक्यातून उगम पावणारा कासाळ वडा उपरी, पळशी, सुपली बंडी शेगाव, या गावातून वाहत जात शेळवे येथे चंद्रभागा नदीमध्ये मिसळतो. पावसाळ्यामध्ये सध्या ओढा दुथडी भरून वाहत आहे. परंतु या ओढ्यावरून पलीकडे जाण्यासाठी पूल असल्याने अक्षरशा ओढ्यांच्या भिंतीवरील पाच ते सहा फूट पाण्यातून उपरी येथील शेतकरी, शालेय विद्यार्थी, व महिलांना दररोज जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. गेल्या अनेक पिढ्यांपासून ओढ्यांवर फुल करून मिळावा अशी मागणी येथील शेतकऱ्यांची आहे ही मागणी अद्यापही मान्य न झाल्यामुळे शेतकऱ्यांची आहे. ही मागणी अद्यापही मान्य न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला आहे. पंढरपूर तालुक्यातील जवळपास नऊ गावापासून हा कासा ओढा वाहत आहे.

पावसाळ्यातील दिवसांमध्ये ओढा नेहमी दुधडी भरून वाहत असतो उपरी सुपली व बंडी शेगाव येथील ग्रामस्थांच्या शेतजमिनी ओढ्या पलीकडे असून अनेकांना उड्यापलीकडे शेतामध्ये पक्की घरी ही बांधली असून पुढे पलीकडे मोठ्या प्रमाणात ऊस शेती आहे व पावसाळ्यातील दिवसांमध्ये पोळा दुथडी भरून वाहत असतो. वोडा पार करण्यासाठी ओढ्यावर पूल नसल्याने ओढ्यांवर असलेल्या बंधारेच्या भिंतीवरून नागरिकांना प्रवास करावा लागत असतो या भिंतीवर नेहमी सात ते आठ फुटापर्यंत पाणी असते अशाही परिस्थितीत शालेय विद्यार्थ्यांना खांद्यावर घेऊन पालक प्रवास करत असतात शेतकरी महिलाही याच भिंतीवरून प्रवास करतात बंधाऱ्याची भिंत अरुंद व निमुळती झाली आहे त्यामुळे पाण्यात पडण्याचा धोकाही असतो येथे मागील काही वर्षांपूर्वी दोन शेतकरी महिला वाहून गेल्याची धक्कादाय घटना घडली आहे. पकार असताना असलेले ओढ्याच्या पाण्यात सिमेंट पाईप टाकून पाणी असल्यानंतर तात्पुरता रस्ता करून त्यावरून ऊस वाहतूक करावी लागत असते परंतु पावसाळ्यामध्ये ओढा दुथडी भरून वाहत असल्यानंतर त्या पाईप वड्याच्या पाण्यात वाहून जातात असा प्रकार वारंवार येतो घडत आहे त्यामुळे ओढ्यांवर कायमस्वरूपी पूल करून मिळावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून ग्रामस्थ शेतकरी करत आहेत परंतु लोकप्रतिनिधींचे याकडे स्पेशल दुर्लक्ष होत असल्यामुळे आज बंधाऱ्याच्या भिंतीवरून सर्वांना जीव घेणा प्रवास करावा लागत आहे या ठिकाणी पूल झाला नाही तर आम्हाला आत्मदहाशिवाय पर्याय नाही असा इशारा येथील शेतकरी ब्रह्मदेव नागणे ,विश्वजीत गव्हाणे, राजेंद्र आजबे ,यशवंत सुरवसे रमेश नागणे, सुनील नागणे, राहुल मोहिते, विशाल गव्हाणे शहाजी गव्हाणे, यांनी दिला आहे.

### अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विजय

# एफआरपी एक रकमीच द्यावी लागणार

## राज्य शासनाची ती मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

एक रकमी एफ आर पी च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाला राज्य शासनाने केलेली स्थिती मागणी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली, यामुळे आगामी हंगामात राज्यातील साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना एक रकमेच एफ आर पी द्यावी लागणार असून याबाबत १९ नोव्हेंबरला पुन्हा सुनावणी होणार आहे.



मागील गाळप हंगामातील साखर उतारा धरून चालू हंगामातील एफ आर पी शेतकऱ्यांना अनेक वर्षे दिली जाते. मात्र राज्य शासनाने त्यावर हरकत घेत २०२२ ला ज्या त्या वर्षाचा साखर उताऱ्यावर एफ आर पी निश्चित करण्याबाबत कायद्यात दुरुस्ती करून परिपत्रक काढले, या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उच्च न्यायालयात आव्हान दिली न्यायालयाने शासनाच्या निर्णय रद्द केला होता.


शुगर केन कंट्रोल ऍक्टानुसार १४ दिवसात एफ आर पी न देणाऱ्या कारखान्याकडून १५% प्रमाणे व्याज वसूल करावे, अशी मागणी स्वाभिमानी संघटनेचे साखर आयुक्त कडे केली होती. त्यामुळे कोट्यावधीची रक्कम कारखान्यांना शेतकऱ्यांना दे लागते मात्र तोपर्यंत राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

मागील सुनावणीच्या वेळी राज्य शासनाच्या प्रतिनिधी हजार राहिला नव्हता शुक्रवारी शासनाने न्यायालयात म्हणणे सादर करत उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती मागितली. पण सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार देत १९ नोव्हेंबरच्या सोनवणे मध्ये ठरवू, असे सांगितले.

# नवरात्र उत्सवात डॉल्बी, डिजे व लेझर लाईट वापरास सोलापूर जिल्ह्यात प्रतिबंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यात दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ते ०७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पारंपरिक पद्धतीने व उत्साहात साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सवाच्या मिरवणुकांमध्ये डॉल्बी, डि.जे. सिस्टीम व लेझर लाईट शोच्या वापरास प्रतिबंध घालण्यात आला आहे. जिल्ह्याचे जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) अन्वये हा आदेश जारी केला आहे.



**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आदेश**

मागील वर्षी सार्वजनिक शक्तीदेवी उत्सव मंडळ व गरबा- दांडिया आयोजक मंडळाकडून आयोजित कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व डि.जे. सिस्टीममुळे काही भाविकांना कान व छातीच्या त्रासामुळे अपंगत्व किंवा जीवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती. तसेच लेझर लाईटमुळे वयोवृद्ध व लहान मुलांच्या डोळ्यांना इजा झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात ज्येष्ठ नागरिक संघटनांनी निवेदन सादर केले असून, उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १ यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजीचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने डॉल्बी, डि.जे. व लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे की, सार्वजनिक शक्तीदेवी उत्सव मंडळ व गरबा- दांडिया आयोजक मंडळाकडून आयोजित कार्यक्रमांमध्ये व मिरवणुकांमध्ये वरील तंत्रज्ञानाचा वापर पूर्णतः प्रतिबंधित करण्यात येत आहे. हा आदेश सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुके व सार्वजनिक कार्यक्रमांवर लागू राहील.

# सारणी शिवारातील सोयाबिन गुडघाभर पाण्यात; ऊस झाला भुई सपाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : भारत देश हा कृषी प्रधान देश मनुन ओळखला जातो पण याच देशातील शेतकरी मात्र आपली शेती कसताना अनेक संकटाचा सामना करुन शेती कसत असतो यात कधी ढगफुटी सद्रश पावसाचे संकट तर कधी कोरडा दुष्काळ शेतकर्यांच्या पदरी असतो .यात यावर्षी तर सततच्या पावसाने शेतकर्यांच सोयाबीन पिक पाण्यात गेल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन सरकारी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहे ,औसा तालुक्यातील सारणी येथील अनेक शेतकर्यांच जिवनमान हे शेतीवर अवलंबुन असुन शेतकर्यांचा सर्वात मोठा सण दिवाळी तोंडावर आला असुन दरवर्षी शेतकरी दीवाळी सण हा सोयाबिन विक्री करुन साजरा करतो पण यावर्षी अतीपावसामुळे सोयाबिन पीक गुडघाबर पाण्यात असुन यावर्षी शेतकर्यांना सततच्या पावसामुळे अर्थीक संकटाचा सामना करावा लागतोय ,पण यावर्षी बळीराजाच सोयाबिन पाण्यात असल्याने शेतकर्यावर अर्थीक संकट आल असुन शेतकरी आमच्या बांधावर प्रशासनाने यावं व पंचनामा करून आम्हाला आर्थिक मदत करावी असे सरकारकडे विनवणी करत आहेत...यावेळी







सद्या निम्न तेरणा नदीओव्हर फुल्ल झाल्यामुळे नदीच पाणी सारणी शिवारातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन अक्षरशः पूर्ण पाण्याखाली आहे आणि आजच्या पावसामुळे तर ऊस पूर्ण खाली पडला आहे त्यामुळे सतत च्या पावसामुळे पूर्ण शेतकरी अति संकटात आला आहे

सारणी गावचे विद्यमान सरपंच तुकाराम वागमारे उपसरपंच रतन तमशेट्टी राजु बिराजदार युवराज बिराजदार राजु पाटील नाना पाटील बालाजी मेनकुदळे उत्तम बिराजदार माजी सरपंच सुरेश बिराजदार गुंडाप्पा हवालदार गुरनाथ चौकशे सतीश बिराजदारविजय बिराजदार सह सारणी येथील शेतकर्यांनी प्रसारमाध्यमांशी आपल्या प्रतिक्रीया मांडल्या ..

# पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट बाजार समितीचा राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्यातर्फे सन २०२५ करिता देण्यात येणाऱ्या वसंत दादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ राज्यातील ३२५ बाजार समितीकडून उत्कृष्ट कार्य करणारी बाजार समिती म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती पंढरपूर या बाजार समितीस मिळाला, या पुरस्काराने पंढरपूर बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा हरवला गेला.



महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्या वतीने बाजार समितीमध्ये विविध उपक्रम कामकाज सोयी सुविधा व वार्षिक निकषाच्या आधारे पंढरपूर बाजार समिती पात्र ठरून राज्यस्तरीय मा वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ राज्य बाजार समिती संघाच्या पुणे येथील वार्षिक सर्वसाधारण सभेत बाजार समितीचे सभापती मा. श्री . हरीश दादा भास्कर गायकवाड, उपसभापती मा श्री राजू बापू विठ्ठलराव गावडे, व सर्व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत पुणे येथे उपस्थित राहून स्वीकारला सदर कार्यक्रमास बाजार समिती संघाचे सभापती मा श्री प्रवीण कुमार नहाटा, उपसभापती मा श्री संतोष सोमवंशी, व संचालक मंडळ राज्य तीन बाजार समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कर्मयोगी स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक (मोठे मालक) यांच्या आशीर्वादाने सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार मा. श्री प्रशांत परिचारक साहेब यांच्या नेतृत्वाखाली, मा श्री उमेश परिचारक चेअरमन युट्युपियन शुगर्स लिमिटेड कचरेवाडी तालुका मंगळवेढा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आजपर्यंतचे माजी सभापती उपसभापती संचालक मंडळ शेतकरी अडके व्यापारी सचिव अधिकारी कर्मचारी कमाल सोलार व सर्व संबंधिताचे सहकार्याने पंढरपूर बाजार समितीचे कामकाज उत्तम प्रकारे चालू आहे पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने पायाभूत सुविधा व इतर सेवा सुविधा आर्थिक कामकाज वैज्ञानिक कामकाज व इतर विषयांमध्ये पात्र ठरत सदर पुरस्कार प्राप्त केला आहे पंढरपूर बाजार समिती नेहमी शेतकऱ्यांचे हितासाठी काम करीत आहे अशी माहिती पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती मा श्री हरीश दादा गायकवाड व उपसभापती मा श्री राजू विठ्ठलराव गावडे यांनी दिली व त्यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन केले.

# अवैध दारू वाहतूक करणाऱ्या इसमावर पंढरपूर पोलिसांकडून कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सोलापुरातून पंढरपुरातील ग्रामीण भागामध्ये स्कुटीवर खताच्या पोत्यामध्ये मोटारीच्या ट्यूब मध्ये वैद्य दारू वाहतूक करणाऱ्या आरोपीला पंढरपूर तालुका पोलिसांनी पकडले.

दिनांक १८ सप्टेंबर रोजी तालुका पोलिसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सोलापुरातील एक व्यक्ती स्कुटी गाडीवर खताच्या पोत्यामध्ये आतील बाजू मोटारीचे ट्यूब मध्ये दारू भरून पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांमध्ये आणून, विक्री करणार असल्याची माहिती मिळाल्याने, पंढरपूर तालुका मौजे देगाव रोडवर जाणाऱ्या स्कुटी चालकाला थांबून विचारपूस केली असता आपले नाव आप्पा नारायण राहणार मार्डी रोड उत्तर तालुका सोलापूर असे सांगितले.

त्यांच्या ताब्यात एक स्कुटी गाडी मिळून आली या गाडीच्या मध्यभागी एका खात्याच्या कव्हर असलेली पोते होते. त्याच्या आत मध्ये मोटार जे टूब त्यामध्ये उग्र वासाची दारू भरलेली एकूण शंभर लिटर दारू भरून स्कुटी मोटरसायकलवर सोलापूर येथून पंढरपूरच्या ग्रामीण भागामध्ये दारू विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना मिळून आलेल्या आहे. सदर व्यक्ती विरुद्ध महाराष्ट्र पोलीस दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर व्यक्तीच्या ताब्यातून मुद्देमाल त्यामध्ये एक स्कुटी मोटरसायकल व युरियाच्या पोत्यामध्ये मोठ्या ट्यूब मध्ये भरलेली १०० लिटर दारू असा एकूण एक लाख दहा हजार रुपयेच्या मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला आहे.



सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सो. अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर ,विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर, व पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस हवालदार स्वप्निल वाडदेकर, पोलीस हवलदार साजन भोसले, पोलीस हवालदार इरफान शेख, पोलीस कॉन्स्टेबल, सागर गवळी, पोलीस हवालदार मंगेश रोकडे यांच्या पथकाने केली आहे.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा युवा महोत्सव उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय युवक महोत्सवात यजमान देवगिरी महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने दोन संगीत कलागटात ढाल जिंकली.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित छत्रपती संभाजीनगर जिल्हा युवा महोत्सव दि. १९ व २० सप्टेंबर रोजी संपन्न झाला. प्रख्यात अभिनेत्री स्मिता गोंदकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. संस्थेचे ज्येष्ठ सदस्य पंडितराव हर्षे अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, संचालक डॉ.कैलास अंभुरे, सांस्कृतिक समन्वयक डॉ.गणेश मोहिते , संस्थेचे सदस्य व सल्लागार समितीचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

### निफाड येथील वैनतेय विद्यालयात माता-पिता स्मृतिदिन संपन्न

### ह.भ.प. आचार्य तुषार भोसले यांचे प्रतिपादन

# आपल्या हिताकरता जो कर्तव्यदक्ष असतो त्याचे आई-वडील धन्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात मेहनत घेऊन ध्येय गाठून मोठ्या उंचीवर जाऊन आपले कर्तृत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा,जीवनामध्ये आपल्या हिताकरता जो कर्तव्यदक्ष असतो त्याचे आई-वडील धन्य आहे असे प्रतिपादन भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ह .भ .प आचार्य तुषार भोसले यांनी केले

निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने वैनतेय विद्यालयात ४१ व्या माता पिता स्मृति दिनाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी बोलताना त्यांनी वरील प्रतिपादन केले

याप्रसंगी व्यासपीठावर न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, ,राजेंद्र राठी, अँड दिलीप वाघवकर, मधुकर राऊत विश्वास कराड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींना गणेश वंदना सादर केले त्यानंतर विद्यालयाच्या वारकरी पथकाने हरिपाठ पाऊली सादर केली.

ह .भ .प आचार्य तुषार भोसले आपल्या भाषणात पुढे म्हणाले की आपल्या कुळाचा वंशजांचा परिवाराचा नावलौकिक आपल्या कर्तव्यावर अवलंबून असतो चांगलं काम केलं तर त्याचा श्रेय आई-वडिलांना जातं आणि वाईट काम केलं तर त्यावर पाणी फिरतं असं ते म्हणाले समाजाच्या उद्धारासाठी समाजाचं चांगलं व्हावं यासाठी जो काम करतो समाज त्यांचीच आठवण ठेवतो जनमानसात त्यांचच प्रतिबिंब असतात असे ते म्हणाले याप्रसंगी आपल्या माता-पित्याच्या स्मरणार्थ या संस्थेला देणगी देणाऱ्या देणगीदारांचा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला.




याप्रसंगी रतन पाटील वडघुले यांचे भाषण झाले. याप्रसंगी वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ , प्राचार्य पल्लवी सानप , मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल, मुख्याध्यापिका प्रसन्ना कुलकर्णी, शिवाजी ढेपले , प्रवीण ठाकरे, कृष्णा नागरे ,कचेश्वर दुसाने, संजय गाजरे, एम एस माळी ,बी आर सोनवणे , बाळकृष्ण ठोके , सी एस वाघ, रमेश जाधव,आदींसह पालक, विदयार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कांचन सानप यांनी तर आभार प्रदर्शन प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी यांनी केले

वैनतेय विद्यालयात अध्ययन अध्यापन करताना शालेय जीवनात आई वडील यांच्याबाबत आदर्श संस्कार व्हावे आई, वडील यांचे महत्व कळावे माता पित्यासंदर्भातील विचारांचे बीजारोपण विद्यार्थी दशेत रुजावे या उद्देशाने ४१ वर्षांपूर्वी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने वैनतेय विद्यालयात माता पिता स्मृति दिनाचा प्रारंभ कविवर्य कुसुमाग्रज यांच्या हस्ते करण्यात आला होता दरवर्षी पितृपक्षात या माता पिता स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात येते या माता पिता स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांत संस्कार रुजवणाऱ्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.